Scanning and PDF creation by : Majhi Duniya

A-PDF Split DEMO : Purchase from www.A-PDF.com to remove the watermark

पसंती साखरपुडा लग्न हनीमून आणि बिदाई एवढं सगळं उरकणारे नवरदेव रोजचे झाले आहेत. आधीच अमेरिकेचं ग्लॅमर, त्यात लग्न ठरण्याचं ग्लॅमर. मग यांच्या सुरस आणि चमत्कारिक कथांना काय तोटा असणार आहे? इकडं आईबापांनी पसंतीक्रमानुसार भावी वधूंची परेड योजलेली असते आणि पंडित



नेहरूंनी पंधरा ऑगस्ट किंवा सव्वीस जानेवारीच्या परेडवरून नजर टाकून जावं तसा हा पठ्ठ्या मुली बघणार असतो.

तोच वेग, तोच भाव, *(भाव जनातला, मनातला आणि खाण्यातलाही!)* काही काही चपळ आईवडलांनी हॉल, मुहूर्त, भटजी, एवढंच काय, मुलीच्या नावाच्या जागी आडवी रेघ काढलेल्या निमंत्रण पत्रिकाही छापून तयार ठेवलेल्या असतात. रिकामी जागा भरा आणि लग्न करा. तिकडे अमेरिकेत ती रिकामी जागा आधीच एखाद्या गोऱ्या कातडीने भरली असण्याच्या घटना घडल्या आहेत, कटू अनुभव आलेले आहेत तरीही माणसांची इंडोअमेरिकन लग्नाची हौस कमी होत नाही, ह्याचं आश्चर्य वाटतं.

पूर्वी साध्या टपालाने लग्नं ठरत ती आत ई-मेलवर ठरतात. भारतीय डाकसेवेचा कळकटपणा लोपून थोडंफार ग्लॅमर येतं. लग्नाळू मुलंमुली ह्या ई-मेलवर संपर्क करतात, चॅट करतात, एक्स्चेंज ऑफ आयडियाज की काय असेल ते करतात, पत्रिका कॉम्प्युटरवर मिळवून बघतात. फोटो स्कॅन करतात. थोडक्यात काय, माध्यम बदलतं, मंजिल तीच असते. थरार वाढतो. पुढे विवाहित आयुष्य

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

पुरेसं रटाळ जाणार असल्याने एवढा थरार आतातरी उपभोगायला हरकत नसावी.

मध्यंतरी एकाहून एक कळस-थरार-किस्से ह्या संदर्भात कानी आले. दोन विवाहेच्छु स्त्रीपुरुष अशा दूरसंवादातून एकमेकाला अजमावणार होते. तर त्या बाप्यानं म्हणे नजरचुकीनं ई-मेल आयडी उतरवतांना डॉट, कॉम वगैरेंची माफक अदलाबदल केली आणि काय आश्चर्य ! त्या वेगळ्या पत्त्यावरच्या पोरीशी त्याचं भलतंच जमलं की ! कॉम चुकले, काम अचूक झालं... या जोडप्यानं काय करावं ? लग्न ह्या ई-मेलवरच्या गाठी असं म्हणावं ? आणखी एक वीर सहार एअरपोर्टवर उतरले तर तिथे त्यांना रिसीव्ह करायला तीन संभाव्य नवऱ्या पोचलेल्या होत्या. बॅगेज क्लिअर करेपर्यंत त्याने त्यातल्या एकीचा पत्ता काटला, मुंबईहून टॅक्सीने पुणं गाठत असताना एक्स्प्रेस हायवेवर आणखी एकीला क्लिअर केलं. इकडे बालेवाडीपाशी गाडी पोचेपर्यंत तिसरीनं लग्नाचा बालेकिल्ला सर केला. वाटेमध्ये इंद्रप्रस्थ कार्यालय लागलं तशी त्या दोघांनी उतरून तिथे लग्न उरकून घेतलं आणि बिबवेवाडीला घरी पोचले तर सत्यनारायण तिथे त्यांची वाट पाहात होता की लगेच हनीमूनला आगेकूच ! ह्याला म्हणायचं खरं मॉडर्न लग्न. ई ऊर्फ घा'ई' घा'ई' लग्न ! ठाय लयीत चालणारी लग्नं मात्र अजूनही दाखवणे, पसंती, साखरपुडा, देवदेवक, सीमान्तपूजन अशी स्टेशन ओलांडत जातात.

एकदा वधुवरांची पसंती झाली की पहिला चर्चेतला मुद्दा असतो तो साखरपुडा कधी, कसा, कुठं, केवढा करायचा हा. करायचा की नाही हा प्रश्न कधीच नसतो. पूर्वीही नव्हता. लग्न ठरल्याच्या बातमीवर, कल्पनेवर शिक्कामोर्तब व्हावं म्हणून हा विधी ! सासऱ्यांनी भावी सुनेला साखरेची चिमूट, पेढ्यांचा पुडा द्यावा, सासूनं फार तर खणानारळाची ओटी भरावी, एवढंच याचं पारंपारिक स्वरूप होतं. घरच्या आणि जवळच्या नात्यातल्या दहा-वीस जणांनी जमावं. चहा-कॉफी आणि माफक मिठाई द्यावी आणि घरोघरी परतावं. संपूर्ण लग्नसमारंभाची जबाबदारी आणि ख़र्च वधूपक्षाकडं असल्यानं निदान साखरपुडा तरी वरपक्षानं करावा, अशी काहींच्यात प्रथा होती. साक्षगंध या नावाखाली वधूच्या कपाळी कुंकवात बुडवलेला बंदा रुपाया चिकवण्याचीही पद्धत होती. इंग्रज आले. त्यांच्याबरोबर त्यांच्या चालीरीती आल्या. त्यातून वेडिंग रिंग, एंगेजमेंट रिंग या कल्पना आल्या. म्हणून मग साखरपुड्याला वधू-वरांनी अंगठ्यांची देवघेव करायला सुरुवात झाली. 'नुसत्या अंगठ्या काय बै द्यायच्या' म्हणून नवरीला साडी, नवरदेवाला पोशाख अशी कलमं वाढली. ओघाओघानं 'साधी साडी कसली बै द्यायची ?' म्हणून शालू आला. तिकडं जावईबुवांना सूट फारच सूट होतोय असं जाणवू लागलं. आता एवढा शालू नेसून, सूट पेहरून 'घरच्या घरीच

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

कार्य, समारंभ करायला खटकणं, ' हे अपरिहार्यच होतं. त्यातून मग हॉल आला, वाजंत्री आली, उपाहारापासून पचपक्कान्नापर्यंत 'खादी' आली, आहेर-मानपान आले, ते आल्यावर त्यांचा पंचनामा आपोआपच आला. करता करता साखरपुडा हे 'मिनीलग्न' झालं. अंतरपाट आणि अक्षता वगळता बाकी सगळं लग्नासारखंच. आदल्या दिवशी मेंदी हवीच. मेंदीबरोबर मैत्रिणींची गोड थट्टा आणि भेळ-रगडा-पॅटिस अशी चटकमटक पोटपूजा हवीच. नवरीसाठी ब्युटिशियन हवीच, हॉलमध्ये फुलांची सजावट हवीच, भटजी हे आपापल्या घरच्या चांगल्या वळणाचे निदर्शक म्हणून हवेतच. त्यांना अजरामर करण्यासाठी व्हिडिओ शूटिंग हवंच. या 'च'कारात ज्याच्या दिडक्या खर्च होतात त्याबाबत त्या वधुपित्यानं मात्र चकार शब्दही काढायचा नाही. 'मुलीला आहे हौस' या कलमाखाली पैशानं आणि कष्टानं झिजत राहायचं. साखरपुड्याला लग्नापेक्षाही जास्त झिजायचं. कारण तो लग्नाचा ट्रेलर! त्यावरून उभयपक्ष एकमेकांची 'ताकद' जोखणार. 'साखरपुड्यालाच पैठणी दिली म्हणजे लग्नात काय एवढं घालणार आहेत कोण जाणे', 'पार्टी मजबूत आहे; पण दानत बेताची', 'जावयाला हिऱ्याची अंगठी द्यायला काय जात होतं?' इत्यादी इत्यादी शक्तिप्रदर्शनपर वाक्यं आठवून पाहावीत.

वास्तवात साखरपुड्याला धार्मिक विधीची विशेष काही चौकट नसते; पण आता एवढा थाटमाट केल्यावर चार माणसांसमोर काही तरी केलेलं दाखवलं पाहिजे. म्हणून मग सीमांतपूजन-वाङ्निश्चय हे लग्नातले धार्मिक कार्यक्रम अगोदर ओढून घेतले जातात आणि त्यांनी साखरपुडा सजवतात. पुन्हा लग्नाच्या आदल्या दिवशी दुसरं सीमांतपूजन! आहे काय अन् नाही काय? विधींचे अर्थ समजून घेण्यात, खरं तर विधींमध्येही कुणाला फारसा रस असतो? एक आपला 'जनरल कल्चरल फॅन्सी ड्रेस' एवढीच सगळ्या खटाटोपाची व्याप्ती आणि एक सज्जड अल्बम किंवा व्हिडिओटेप ही फलश्रुती.

साखरपुड्याला पुड्यात साखर किती असते कोण जाणे, वातावरणात मात्र प्रचंड 'साखर' असते. नवी सून गोड, नवा जावई गोड, सासू गोड, व्याही गोड, नणंद गोड, भावजय गोड, मेहुणे गोड, साडू गोड असा चौफेर गोडवा सांडत असतो. नव्या सासूनं घेतलेली साडी नव्या सुनेला प्रचंड आवडते. व्याह्यांनी जावयासाठी घेतलेल्या अंगठीचं जावयाचे आईवडील खूप कौतुक करतात. मुलगी सुस्थळी पडल्याची भावना मुलीकडचे इतके वेळा आणि इतक्या गोडव्यानं बोलून दाखवतात की त्यांना मधुमेहाची भावना होईल, अशी भीती वाटत राहते. मुलीचं चांगलं वळण सिद्ध करण्यासाठी ती सारखी चेकाळल्या-

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

सारखी अगदी लहानथोर साऱ्यांनाच नमस्कार करत सुटते. सासरचे गडीनोकरही नमस्काराच्या भडिमारातून सुटत नाहीत. केलेला असावा, वाया जात नाही, असा एकूण भाव. पुलंनी या अर्थानं 'नवरी मुलगी नम्रतेची पराकाष्ठा करत बसलेली असते' असा फार सुंदर शब्दप्रयोग योजलेला आहे. मी प्रतिभेची पराकाष्ठा करूनही इतकं सुंदर लिहू शकणार नाही; पण साखरपुड्याची 'दाखवेगिरी' पुन्हा पुन्हा दिसल्याशिवाय राहत नाही एवढं नक्की.

साखरपुडा झाल्यापासून लग्न होईपर्यंत नवरीमुलगी वरचेवर नवरदेवाच्या घरी जाऊ लागते. खरेदीपूर्वी एकत्र जमायला जाते, भेटायला जाते, कुणी आजारी वगैरे पडलेलं असलं तर मदतीला जाते, धार्मिक कार्यक्रमांना जाते. प्रियकराला भेटायचा एकही चान्स सोडत नाही; पण यातूनच हळूहळू कुरकुर, कुरबुर अशा कुगोष्टींना चान्स मिळायला सुरुवात होते. माणसं जास्त जवळ येण्याच्या नादात लवकर दूर जातात हे सार्वत्रिक सत्य इथंही लागू पडतं. त्यांनी फार दूर जायच्या आत लग्न लागावं हे उत्तम! म्हणजे त्यांना फारसा फेरविचार करायला, कीस पाडायला, चुका शोधायला, नाकं खुपसायला, बोटं मोडायला अवधी मिळत नाही. लग्न ठरवून पुढं फार दिवस ठेवायचं नाही, झट मंगनी पट ब्याह यासारखे विचार आपल्याकडं जुन्या काळापासून प्रसृत आहेत हे यामुळंच. जुन्यांचा व्यवहारी शहाणपणा हा काही औरच होता!

आता मुलामुलींची तिशीपर्यंत चालणारी शिक्षणं, देशपरदेशच्या वाऱ्या, व्हिसाची तंत्रं, अशा अनेक गोष्टींमुळं लग्नाच्या वरताण वाटावा एवढा जंगी पुणेरी साखरपुडा आणि पुढं दोन-दोन चार-चार वर्षांनी जगाच्या पाठीवर कुठं तरी लग्न असे प्रकारही घडतात. काही वेळा दरम्यान एवढा वेळ जातो आणि एवढ्या घटना घडतात की वाटेत कुठं तरी हे लग्न गहाळ होऊन गेलं तरी कुणाला पत्ता लागत नाही. तर काही वेळा नवरानवरींना या कालावधीत एकमेकांच्या बऱ्याच नसत्या गोष्टींचा पत्ता लागल्यानंच लग्न रद्द होतं, काही झालं तरी, झालंच तर लग्न रद्द होतं. मोडतं, बिनसतं, बिघडतं; पण साखरपुडा हा कधीच मोडत-बिघडत नसतो. या एका बाबतीत तो लग्नाच्या वरचढ ठरतो.

आमचे एक स्नेही नेहमी आपल्या साखरपुड्याचा वाढदिवस साजरा करतात. लग्नाचा नव्हे. त्यांच्या वागण्यातल्या अनेक विक्षिप्तपणांपैकी ही एक विक्षिप्त लहर असेल असं वाटून मी त्याकडं कधी लक्ष दिलं नव्हतं; पण यंदाच्या त्यांच्या साखरपुडा-वर्धापनदिनी मी अवचित त्यांच्या घरी पोचले, तेव्हा याच विषयावरून छेडछाड झाली आणि काही विचारमौक्तिकं कानी पडली. त्यांचं म्हणणं असं की एकूण वाढदिवस करायचा तो आनंदाची वाढ व्हावी म्हणून,

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

आनंदाच्या गोष्टीचा. साखरपुड्याच्या दिवशी आपण तेवढे आनंदात असतो तेवढे उभ्या आयुष्यात कधी नसतो. आपलं निरपवाद कौतुक होतं. उमेद असते, जबाबदारी नसते, काही सिद्ध करायचं नसतं ! जाणत्या आयुष्यातला हा एकमेव असा दिवस. म्हणून याचं वर्धापन गरजेचं. लग्न हा या गोष्टीचा सुखान्त, शेवट, कारण तिथं सुखाचा अंत नक्की ठरलेला.

एकूण समांतर अनुभवामुळं मला त्यांचं म्हणणं बरंचसं पटलं आणि विवाह हा शब्द नव्यानं भिडल्यासारखा वाटला. साखरपुड्यातली वाहवा किंवा वाह् ! वाह् ! जिथं विरत विरत जाते तो विवाह ! विगत: वा: वा: यस्मात् स: विवाह: ! *( पाणिनी ते मो. के. दामले, यांची दोन्ही कर जोडून क्षमा मागून ! )*

साखरपुडा पार पडला की दोन्ही घरची मंडळी लग्नाच्या तयारीला लागतात. आपल्याकडचं लग्न म्हणजे ह्या पृथ्वीवर साजरं होणारं पहिलं आणि शेवटलं लग्नं होय, ' ऐसा विवाह पुनश्च होणे नाही, ' अशा कल्पना दोन्ही घरांना चेकाळवून टाकतात आणि होऊ लागते कामांची भली मोठी यादी तयार ! कोणा-कोणाला बोलवायचं, काय द्यायचं, काय घ्यायचं, काय खायचं, कशाकशाची आठवण ठेवायची ह्या साऱ्याची धुमश्चक्री माजू लागते.

लग्नसमारंभ कंत्राटी पद्धतीनं करायला द्यायची सुरुवात झाली आणि लग्नानिमित्त घरच्यांनी करायची कामं एकदमच कमी झाली. धान्यखरेदी, जिनसांची साठवण, पिठं दळणं, फराळाच्या जिन्नसांची तयारी, अंदाज करणं, त्यानुसार आचाऱ्यांना शिधा काढून देणं वगैरे लबेदा सुटला; पण कामाची खरेदी संपली तरी हौशीच्या खरेदीचं काम काही संपलं नाही. उलट ते वाढलं. प्रचंड वाढलं आणि लग्नाची तयारी करणं याचा अर्थ रोज सकाळी उठल्यावर थैल्या घेऊन पुण्यात लक्ष्मी रस्त्यावर किंवा मुंबईत रानडे रस्त्यावर जाऊन धडकणं एवढाच उरला. होकार किंवा परस्पर पसंती कळलेल्या क्षणापासून ही जी खरेदी सुरू होते, ती साधारण लग्नाच्या मुहूर्ताच्या आधी तासभर थांबते. काहीकाहींची तेव्हाही थांबत नाही आणि इकडं लग्न लागत असताना तिकडं नवरीच्या पैंजणाचे पडलेले घुंगरू बसवून घेण्यासाठी किंवा जावयांच्या टायची मॅचिंग टायपिन कुठं तरी गळफटली म्हणून नवी टायपिन आणण्यासाठी एखादं खरेदीपथक बाजारात फिरत असतं.

इथंच लग्नाच्या खरेदीतली कळीची गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ही खरेदी नेहमी टोळीनं किंवा पथकानं होत असते. एकटी व्यक्ती बाजारात गेली आणि दणादणा दहा आयटेम घेऊन परत आली, असं कधीच करायचं नसतं. उद्या तुम्ही फोनवरून ' एक चांगलासा शालू पाठवून द्या, ' अशी ऑर्डर द्यायला सांगाल ! याला काय अर्थ आहे ? एवढं लग्न करायचं तर दिवसचे दिवस दुकानं पालथी

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

घालायला नकोत ? चार तज्ज्ञांची मतं घ्यायला नकोत ? कुठं काय स्वस्त आणि मस्त मिळतंय याचा आढावा घ्यायला नको ? प्रचंड चोखंदळ निवड व्हायला नको ? घासाघीस, बार्गेनिंग, मुत्सद्देगिरी नको ? दर खेपेला आणलेल्या मालापैकी पंचवीस-तीस टक्के माल परत करून, बदलून आणायला नको ? लग्नाच्या खरेदीमध्ये अदलाबदलीचा एक स्वतंत्र अध्याय असतो. अगोदरच खूप चर्चा करून, तंगडतोड करून, कीस पाडून चार-दोन जिन्नस आणावेत आणि घरी त्यांचं प्रदर्शन मांडताच पुन्हा खूप चर्चा होऊन, कीस पाडून त्यातले निम्मेअर्धे बदलायचे ठरावेत, हा नेहमीचाच अनुभव असतो. करता करता लग्नाच्या खरेदीच्या दोन टीम्स तयार व्हायला वेळ लागत नाही. एक टीम, बेसिक शॉपिंग करणारी, दुसरी टीम नापसंत माल बदलून आणणारी. या दोन्ही टीम्सचं कार्य परस्परावलंबी असतं हे उघडच आहे. खरेदी जेवढी जास्त तेवढी अदलाबदल जास्त. कारण दुकानांमध्ये जेवढं जास्त जास्त फिरावं तेवढं जास्त जास्त विकत घ्यावंसं वाटणार. जास्त घेतलं की चॉईस-निर्णय-निवड थोडंफार चुकणारच. दुकानदारच तो, तोही अधुनमधून फसवणारच. कमअस्सल माल गळ्यात पाडणारच. तस्मात् अदलाबदली अटळ. कित्येकदा एक नग बदलायला जाऊन चार नवे आणि नको ते नग विकत घेऊन येणारेही मेंबर निघतात. या सगळ्या गदारोळातून खूप लोकांना लग्नासाठी आपण खूप काम करतोय, अशा भ्रमात राहता येतं. ही एकमेव आवक असते. बाकी बहुतेक नापसंत निरुपयोगी वस्तू गोळा करण्याचीच उठाठेव होते.

यात नवऱ्या मुलाची, नवऱ्या मुलीची खरेदी हा अर्थातच ‘ बडा ख्याल ’ असतो. ‘ जन्माचा ’ जोडीदार अर्ध्या तासात निवडून पक्का करणारे महाभाग अर्धा तास वापरायचा एखादा ड्रेस, साडी यावर मात्र खरेदीसाठी जन्माचे परिश्रम, वेळ उधळत असतात. लग्नातला सूट लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाला व्यवस्थित होऊ शकणारे नवरदेव क्वचितच कुठं आढळतात. काय करणार, लग्नानंतर दिवसादिवसाने ते शुक्लेंदुवत् की काय म्हणतात तसे वाढत असतात. सूट वाढत नाही. वाढत्या अंगासाठी शिवलेला नसतो. साहजिकच तो वर्षानुवर्षं हँगरवर लटकत राहतो. वयाच्या चाळिशीच्या सुमाराला अनेकांना एकाएकी ‘ फिगर कॉन्शसनेस ’ येतो. पुन्हा, ‘ त्या सुटात मावण्याएवढा होऊन दाखवतो की नाही बघा ’ अशासारख्या प्रतिज्ञा ते करतात. मग कुठं जिमला जा, कुठं दोरीवरच्या उड्या मार, कुठं अन्नासाठी तळमळ असं करत करत कुणी कुणी त्या सुटाच्या मापात येण्याचा पराक्रम करतातही; पण तोवर त्याची फॅशन पुरती गेलेली असते. पँटचा तळ, कोटाचा गळा, बटणांची पट्टी-भोकं- जागा या गोष्टी इतक्या काही आमूलाग्र बदललेल्या असतात की तो सूट घालणाऱ्याचा फक्त धीर सुटतो किंवा

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

त्याला बघणाऱ्यांना हसू फुटतं. शेवटी सुटाची धाव 'हँगरपासून हँगरपर्यंतच' राहते. दरम्यान तेव्हाच्या त्या नवरीच्या शालूचा मुलीसाठी ड्रेस किंवा शरारा आणि पुढं त्याचीच नातवंडासाठी बारशाची कुंची इथवर रूपांतरं झालेली असतात. कारण लग्नातली पोलकी वर्षसणालाच काय, पहिल्या मंगळागौरीलाही अंगात शिरू न शकणाऱ्या वर्धिष्णु महिला घरोघरी असतात. लग्नासंबंधीच्या खरेदीच्या कळसाध्यायाची जिथं ही अवस्था होते, तिथं आम खरेदीची फरपट काय वर्णावी ? तो जांगड माल, ते स्टीलचे कुंडे, ती गौरीहराची मडकी, त्या विहिणीच्या पंगतीनंतर हातावर ठेवायच्या चांदीच्या लवंगा, तो चौरंग, तो काल्यांचा वेल, ती मोत्याची अक्षत, तो तोंड धुण्याच्या पाण्यावरचा फणीकरंडा... असंख्य वस्तू नुसत्या गोळा होत असतात, होत असतात. पैसा जात असतो, जात असतो. लग्नाच्या त्या एका दिवशी वरमाईला खूष करण्यासाठी ही सारी धडपड असते. पुढं आयुष्यात एकाही दिवशी तिला काडीची किंमत द्यायची नसल्यामुळं निदान त्या दिवशी तरी तिला मालामाल करून टाकणं सोपं, सोयीचं वाटतं आणि तीही बापडी सिंहासनावर बसून नजराणे घेणाऱ्या राजा-महाराजासारखी त्या चौरंगावर बसून आहेर-ओटी वगैरे घेत आपलं औटघटकेचं राज्य साजरं करून घेते. बाकी दिलेल्या साडीचा पोत-रंग-काठ-डिझाईन-लांबीरुंदी यातलं काही ना काही *( किंवा काहीही )* तिला आवडलेलं नसतं किंवा डिट्टो तशीच साडी तिच्या घरी 'कध्धीची पडून' असते तो भाग वेगळाच. लग्नाच्या निमित्तानं आपल्याला काय दिलं याची आठवण ठेवण्यापेक्षा काय काय दिलं नाही, हेच तेवढं उगाळणाऱ्या बायकाही खूप असतात. यांच्या स्मरणशक्तीला माझा कायमचा सलाम असतो. पस्तीस किंवा अठ्ठावीस वर्षांपूर्वी कुणी तरी कुणाच्या तरी लग्नात आपल्याला ब्लाऊजपीस म्हणून जेमतेम अर्धा वार कापडाचा तुकडा कसा टेकवला, हे लक्षात ठेवणं ही केवढी सिद्धी आहे बरं !

सारांश काय, लग्नातली खरेदी ही भेट देणारा आणि घेणारा या दोघांनाही पूर्ण संतोष देणारी क्वचितच असते. हा वेळ, पैसा, शक्तीचा अपव्यय टाळण्यासाठी रोख नोटा, गिफ्ट कुपनं वगैरे द्यायचा पर्याय शोधला की 'अगदी हौस म्हणून नसावी म्हणजे काय ?' यावर खल होतो. 'न फिर तू जी सकेगा और न तुझको मौत आयेगी' असा हा पेच सूज्ञांनाही चुकत नाही. अज्ञ माणसं स्वतःच्या हुषारीनं तो आणखी पीळदार करतात. हुषारी कुठली, तर एखाद्या मानकरणीला कुठल्या रंगाची साडी देऊ असं विचारणं वगैरे. रंग विचारला की रंगाचा भंग व्हायला कितीसा उशीर ? एक हिरवा किंवा लाल रंग म्हटला तरी त्याच्या शेकडो छटा निघतात आणि नेमकी खरेदी केलेली छटाच कशी

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

सगळ्यात टाकाऊ आहे, असं सुनवून ती मानकरीण बरोब्बर स्वत:चा रंग दाखवते. त्यापेक्षा आपल्याला 'राजीखुशीनं अक्कलहुशारीनं नशापाणी न करता' जे रास्त वाटेल ते घ्यावं अन् मोकळं व्हावं. घेणाऱ्यांनीही याच वस्तू घ्याव्यात, पुढं अशाच कोणाला तरी द्याव्यात आणि मोकळं व्हावं.

आपल्याकडं एखादं लग्न चांगलं झालं असं म्हणण्याचं मोजमाप अशा निरर्थक खरेदीवरून, देवघेवीवरून ठरतं, तेव्हा मात्र अंमळ खटकतं. 'अगं, जयूनं लिनाच्या लग्नात विहिणाला चांदीचा चौरंग दिला', 'काय लग्न केलंयऽऽ विहिणीला दोन-दोन शालू होऽऽ' किंवा 'लग्नाचा नुसता बार उडवून दिला. प्रत्येक पुरुषाला सुपारीचं चांदीचं भांडं...' अशी वाक्यं सर्रास ऐकू येतात.

नुकतंच आमच्या एका नातेवाईकांकडं लग्न झालेलं आहे. त्याची आठवण इथं येते. लग्नानंतरचा चौथा-पाचवा दिवस असेल. मी घरी पेपर वाचत बसले होते. एका आगामी सिनेमाविषयी परिचयपर लेख आलेला होता त्याच्यात. कथा, गीतं, संगीत, कलाकार यांच्याविषयी लेखात फार काही नव्हतं. एकूण किती कोटींचा पिक्चर बनतोय आणि त्यातलं एक आयटम साँगच कसं दीड कोटींचं होतंय हेच पुन्हा पुन्हा लिहिलं होतं. तेवढ्यात त्या लग्नघरातल्या कर्त्या बाई लाडू-चिवडा द्यायला वगैरे आल्या. लग्न कसं महान झालं हा विषय तोंडाशी होताच. तर त्याही पुन्हा पुन्हा एकच गोष्ट सांगायला लागल्या, 'अहो नुसत्या देण्याघेण्याच्या साड्याच पंच्याऐंशी हजाराच्या आसपास झाल्या... विहिणीच्या मानापानाचे पंधरा हजार वेगळेच.'

मनात आलं, या खरेदीचं 'आयटम साँग' तर आळवत नाहीयेत ना ? नाही तरी सिनेमातही काही नवं-वेगळं नसतं, अन् लग्नातही काही नवं-वेगळं नसतं. माफक थ्रिल जोश- थरार वगैरे जो काही यायचा तो आयटम साँगनंच ना ? तवां मंडळी, हून जाऊ द्या !

पूर्व परीक्षा संपली की जशी वातावरणामध्ये वार्षिक परीक्षेची हवा जाणवते तसाच साखरपुडा झाला म्हणजे लगीनघाईचा साक्षात्कार व्हायला लागतो. मग भलेही हे दोन समारंभ दोन आठवड्यांच्या अंतरातले असोत की दोन महिन्यांच्या. लग्न ठरलंय, खरोखरच ठरलंय, पक्कं झालंय, साखरपुड्यामुळं जाहीर झालंय. त्याची सगळी जबाबदारी आपल्यावर आहे. आपल्या दैनिक व्यवहारांच्या असंख्य पटीनं मोठी उलाढाल आता करावी लागणार आहे. अनेक रूढी, परंपरा, दैवतं, माणसं, नाती वगैरेंना थोडे दिवस स्मरावं आणि सांभाळावं लागणार आहे. चुका काढायला सगळे टपलेलेच आहेत. मदतीसाठी हक्काचं, भरंवशाचं जवळ जवळ

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

कुणी असणार नाहीये. अशी एकेक जाणीव होणं म्हणजे लगीनघाईला सुरुवात होणं. लग्न करायला म्हणजे करून द्यायला निघालेल्या प्रत्येकाला या पृथ्वीवरचं अंतिम - आदर्श लग्न कसं असतं ते आपणच दाखवणार आहोत, असा भ्रम झालेला असतो. घरामध्ये आतापर्यंत यापूर्वी झालेल्या एकेका लग्नामधल्या चुका उगाळून उगाळून पुरत्या पाठ झालेल्या असतात.

'बबडीच्या लग्नपत्रिकेत मुहुर्ताची वेळच छापायची राहिली... कसली लाज गेलीये एकेकाची.'

'ताईच्या लग्नात बिनपाकाची जिलेबी वेगळी काढायची राहिली. मानाच्या पंगतीत मधुमेहवाल्यांनी नुसतं थैमान घातलं. आठवतंय ?'

'कांचनच्या सासूला रिकामी कुयरी दिली गेली हो तोंड धुण्याच्या पाण्यावर... शोभतं का ?'

'अनंताच्या लग्नाचा मुहूर्त होऊन गेल्यावर दहा मिनिटांनी लग्न लावलं भटजींनी.'

असल्या खमंग गोष्टी प्रत्येक घराच्या लग्नखात्यात रुजू असतात. त्यांचं स्मरण करण्याचे हेच दिवस असतात. या जुन्या चुका टाळून नव्या फ्रेश चुका केल्या की लगीनघाईचं खरं सार्थक होतं. ज्या नवरा-नवरीसाठी ही धूमधमाल चालणार असते ते दोघं या काळात या कशातच नसतात. त्यांना लगीनघाईत भाग घ्यायला वेळ नसतो. मनानं ते वेगळ्याच घाईला आलेले असतात. दिवसभर आपापल्या नोकऱ्या वगैरे करून एरवी मोकळा मिळालेला क्षण न् क्षण त्यांना एकमेकांसाठी द्यायचा असतो. जोडीनं सिनेमे-नाटकं बघणं, एकमेकांच्या मित्रमैत्रिणींना भेटणं, एकमेकांना आकर्षित करणं, खूष करणं, आमनेसामने किंवा फोनवर तासन् तास बोलणं अशी एकाहून एक महत्त्वाची कामं त्यांना करायची असतात. रिसेप्शनला गुलाबजाम असावेत की गाजरहलवा, शालू आठ हजारांचा घ्यावा की दहा हजारांचा असल्या फडतूस गोष्टींवर विचार करायला, वेळ घालवायला ते थोडेच मोकळे असतात! ते ओझं मुख्यतः मुलीच्या आईबापानं आणि त्यातही खासकरून मुलीच्या आईनं वाहायचं असतं. तिचा लवकरच युद्धात डोकं गमावलेला मुरारबाजी होणार असतो. येणेप्रमाणे.

काही काही गोलंदाज जसे बॉलिंग करताना खूप लांबच लांब स्टार्ट घेतात तसंच काही लग्नांचे, लग्नघरांचे दीर्घ स्टार्ट्स असतात. थेट घराला रंग लावण्यापासून ते सुरुवात करतात. पूर्वी घरात लग्नं होत. दारात मांडव पडे. त्यामुळं घराला पिवडी लावणं, सफेती करणं या प्रथा होत्या. आता लग्न होणार एखाद्या मंगल कार्यालयात. रिसेप्शन होणार एखाद्या लॉनवर. नवरानवरी निघून

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

जाणार परगावी किंवा परदेशी. वऱ्हाडी हॉलवरच येणार आणि पंगती उठताच आपापल्या आप्तमित्रांकडं पांगणार. अशा परिस्थितीत घराला रंग लावण्याचा व्याप मागं का लावून घ्यावा, असा शुद्ध तार्किक सवाल करता येईल. करू नये. कारण इकडं लग्न चढायला लागल्याची पहिली खूण असते घरावर रंग चढणं ही; पण रंगासाठी कित्येक हजार रुपये आणि कित्येक दिवसांचे कष्ट अशी दुहेरी किंमत मोजावी लागली म्हणजे हळूहळू भान यायला लागतं. लग्नाच्या सामानासाठी एक खोली, एक कपाट रिकामं करायचंय. सोन्या-चांदीची जोखमीची उलाढाल करायचीये. गेली दहा-पंधरा वर्षं बेपत्ता असलेल्या नातेवाईकांचे पत्ते मिळवायचेत. कुलदैवताला आपला मुखडा दाखवून यायचंय. पत्रिकेचा नमुना-मसुदा ठरवायचाय. घरातला परंपरागत शेला-कद वगैरे ऐवज धुवायला टाकायचाय. माळ्यावरचा पितळी किंवा तांब्याचा गौरीहार शोधून ठेवायचाय. मंगलाष्टका लिहिणारा घरगुती कवी किंवा कवयित्री शोधायचीये. पत्रिकांवर पत्ते घालायला जरा बरं हस्ताक्षर असणारे दोन-तीन स्वयंसेवक हासील करायच्येत. आणलेल्या आहेरांची आकर्षक बांधणी करायचीय. ओटीसाठी स्पेशल 'असोला' नारळ मिळवायचाय. सामानाच्या बॅगा भरायच्यात. त्यांच्यावर लेबलं लावायचीयेत. खुद्द आपणही आपल्या परीनं बरं दिसायचंय. ब्युटीपार्लरसाठी वेळ राखून ठेवायचाय. थकलेलं असून न थकल्यासारखं दाखवायचंय. केवढी कामं ही! आपल्या नेहमीच्या घरात, नेहमीच्या माणसांच्या नेहमीच्या शक्तीमध्ये हा गाडा कसा ओढायचा ?

समारंभाचं नेटकं नियोजन करण्याचा सध्याचा जमाना आहे. लोक कोणत्याही गोष्टीसाठी कार्यक्रम करतात आणि मजबूत किंमत मोजून भाडोत्री तत्त्वावर तो आयोजित करून दाखवतात. लग्नाच्या बाबतीतही अशा सेवा देणाऱ्या कंपन्या मागं राहू नयेत, हे उघडच आहे; पण लगीनघर आणि त्या घरातली कर्ती स्त्री यांची सुटका कोणतंही व्यवस्थापन करू शकत नाही, शकणार नाही. घरातला व्याप-ताप-पसारा-गोंधळ-नासधूस आणि तिथल्या प्रमुख बाईची फरपट तडफड - तारांबळ - डोक्यातला गोंधळ - शीण अष्टावधानीपणाची कसोटी हे सगळं सनातन आहे. लग्नाआधी दोन दिवस मदतीला म्हणून आलेली काकी-मामी-मावशी ही फक्त तिच्या गोंधळाला हातभार लावायपुरतीच मदत करते.

"वहिनीऽ चांदीची समई कुठं ठेवू ? गुरुजी म्हणतात काम झालं तिचं."

"कपाटात ठेव ना."

"कुठल्या कपाटात ?"

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

"ते नाही का... माजघराच्या कोपऱ्यात आहे ते ?"

"त्याला कुलूप आहे !"

"किल्ली खिळ्याला आहे ना."

"कुठला खिळा ?"

"तो हो... दरवाजाच्या कोपऱ्यावरचा..."

"असं असं... दरवाजा का ? कुठला दरवाजा."

अशी प्रश्नोत्तरं करून करून केलेलं काम काय गतीनं होणार आणि कसली मदत मिळणार ? कुठलं कपाट, कुठली किल्ली, कुठला कप्पा असं करता करता शेवटी कुठल्या तुम्ही, कुठली मी, इथवर हे प्रश्नोपनिषद जातं. तेवढ्यात घरच्या बाईची दहा कामं करून होणार ! आणि लगीनघाईत शंभर माणसं गुंतलेली. शिंपी वेळेवर कपडे शिवून देईल ना, जेवणाचा कॉन्ट्रॅक्टर बर्फाचं पाणी प्यायला पुरवेल ना, फुलांचं तोरण सांगितलेल्या मापाचंच येईल ना, विहिणीसाठी खास ऑर्डर देऊन बनवलेल्या चौरंगावर विहीण मावेल ना, जुनीच चांदीची भांडी पॉलिश करून आहेरामध्ये देतोय हे व्याह्यांच्या लक्षात येणार नाही ना, रुखवतावर मांडण्यासाठी करायच्या संत्र्याच्या बर्फीचा रंग संत्र्यासारखाच वाटेल ना, *(चिकूसारखा वाटणार नाही ना ?)* अशा काळज्या तरी किती वाहायच्या ?

या सगळ्या गोष्टींची असंख्य फोन-निरोप वगैरेतून खातरजमा करून घेतली तरी लगीनघाईमध्ये काही खास आयत्या वेळेचे गोंधळ असतातच. त्यापैकी सर्वांत खासा गोंधळ म्हणजे सगळ्यात महत्त्वाच्या कपाटाची किंवा ट्रंकेची किल्ली हरवणं. लग्न झाल्याच्या दुसऱ्या दिवशी ती नक्की सापडणार असते, कारण ती आठवणीनं जपून ठेवलेली असतेच; पण त्या वेळी ती सापडून काहीच उपयोग होत नाही. कारण लग्न लागून गेलेलं असतं आणि सबंध कुलूपही वेडंवाकडं उचकटून, फोडून झालेलं असतं. ती किल्लीच नव्हे तर ती ट्रंक किंवा ते कपाटही आता काही उपयोगाचं राहिलेलं नसतं. एवढा भीमपराक्रम सगळ्या लग्नघरांना करता आला नाही तरी दोन-तीन किरकोळ हादसे तर हातसे सहज होऊन जातात. लग्नासाठी हौसेनं मदतीला आलेल्या लेकुरवाळ्या लेकीच्या, पुतणीभाचीच्या लेकराला हमखास गोवर - गालगुंड असले साथीचे आजार होतात. या गडबडीत पोराला आवरावं की गोवराला आवरावं या दुग्ध्यात घरदार पडलंच म्हणून समजा. झालंच तर लगीनघाईत एखाद्या कार्ट्यानं बुंदीची कळी तोंडात घालण्याऐवजी नाकात घालून सर्वांच्या नाकी दम आणणं, एखाद्या वऱ्हाड्याच्या वाहनाला अपघात होणं, कुणाचे तरी दूरस्थ नातेवाईक गचकल्यानं अचानक सूतक ओढवणं, हौसेनं नाक टोचून घेतलेल्या नव्या नवरीचं नाक पिकल्यानं घरादाराचं डोकं पिकणं, कुणाचं तरी

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

रेल्वे-आरक्षण चुकून एक महिना अगोदरचं अगर नंतरचं निघाल्याचं ऐन वेळी लक्षात येणं *( लग्न आणि महिना चुकणं यांचं असंही नातं असतं महाराजा ! )* ऐन लग्नाच्या दिवशीच रिक्षाचा संप जाहीर होणं अशांपैकी एक किंवा अनेक गफलती लग्नातलं नाट्य वाढवायला मदत करतात.

या सगळ्या धुमश्चक्रीमध्ये लग्नाचा प्रत्यक्ष दिवस कधी येऊन समोर उभा ठाकतो, हे कळतही नाही. तो येतो, जातो, त्याचे चोवीस तास चोवीस सेकंदासारखे पापणी लवायच्या आत संपल्यासारखे वाटतात. नंतर सगळ्या कर्त्या किंवा स्वतःला कर्त्या मानणाऱ्या माणसांच्या मनात एकच प्रश्न उरतो, एवढ्यासाठी आपण एऽऽवऽऽढी धडपड करत होतो ? हा भलताच आध्यात्मिक प्रश्न झाला. हे मात्र त्या थकावटीत त्यांना जाणवत नाही !

किती बरं असतं हे...

लग्नाच्या सगळ्या पूर्वतयारीच्या धडपडीचा, लगीनघाईचा कळसाध्याय असतो तो म्हणजे प्रत्यक्ष लग्न लागण्यापूर्वीची दहा-बारा मिनिटं. लग्नातली एकूण गुंतागुंत त्याच्या मुहूर्तापासूनच सुरू होते. लग्न हे कधीही ठणठणीत साडेनऊ किंवा सव्वादहाच्या मुहूर्तावर होत नसतं. नऊ एकोणतीस, दहा साडेसोळा असल्या वेळांवरच लग्नं लागतात. लग्नानंतरचं आयुष्यही अशीच मिनिट-सेकंदांची कसरत करण्यात जाणार, सोपं, ठणठणीत वगैरे काही जाणार नाही हे जाणत्यांनी इथंच समजून घ्यायचं असतं. अर्थात जे लग्नाला उभे राहतात ते जाणते नसतात, म्हणून तर त्या अरिष्टामध्ये आपल्या पायानी शिरत असतात. तर हा जो काही सोपा किचकट मुहूर्त असेल त्याच्या आधीची काही मिनिटं त्या त्या कार्यालयाला, सभागृहाला, हॉलला पुरतं रणभूमीचं स्वरूप येतं, हे मात्र नक्की. मुहूर्त भल्या पहाटेचा असो किंवा माध्यान्हीचा, बरेच लोक अक्षता टाकायला म्हणून त्याच्या काही क्षण आधी हॉलमध्ये पोचायचं ठरवतात. मग ते आणि त्यांची वाहनं दरवाजापाशी गदारोळ माजवतील हे ओघानं आलंच. इकडं हॉल तुडुंब भरलेला आणि तिकडं शेवटच्या क्षणी आलेल्या एखाद्या लांबच्या काकूला किंवा मावशीला गर्दी कापत फाटकापासून स्टेजपर्यंत पोचायच्या महत्त्वाकांक्षेनं ग्रासलेलं ! दरवाजापाशी उभा असलेला कुणी तिच्या हातात अक्षता कोंबतोय, ती जरीच्या पदराचा बोजा एका हातानं सांभाळत, दुसऱ्या हातात अक्षता घेऊन, कोपरानं गर्दीला ढोसत पुढं सरकत्येय. जाता जाता दिसेल त्याच्या डोमलावर अक्षता भिरकावत्येय. तशाच आपल्या पायाखाली येतील तेवढ्या सगळ्या करंगळ्या-अंगठे चिरडत्येय; पण एकूण गदारोळात कुणी किंचित कण्हलं तर ते ऐकू येणं शक्य नाही असा सगळा बुजबुजाट चालतो. एका कार्यालयात दोन-तीन मजल्यांवर

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

दोन-तीन लग्नं सुरू असली म्हणजे तर या बुजबुजाटाला पारावार राहात नाही. कोण कुणाशी लग्न करतंय, *(लक्षात घ्या, कोण करतंय हे विचारलंय, का करतंय हे विचारलेलं नाही.)* कोण कोणत्या टाळक्यावर अक्षता उधळतोय, हे कळेनासं होतं. गंगा-सिंधू-सरस्वती-कावेरी-महेंद्रतनया वगैरे सगळ्या नद्यांना सामावून घेईल असा हा जनांचा महासागर लोटवला की आपण थाटात लग्न केलं असं पुष्कळांना वाटतं, त्याला आपण काय करणार ?

आयुष्यात कुणाला कधी भाव येईल हे सांगवत नाही. उदा. लग्नघटिकेच्या आधी अचानकपणे मुलीच्या मामाला येणारा भाव. एकदम भटजी पुकारा करतात, 'मुलीच्या मामांना बोलवा.' मग आसमंतात एकदम 'मामा-मामा' असा गजर सुरू होतो. या मामालाही पक्की खात्री असते की एरवी आपल्याला कुणीही कणभरही विचारणार नाहीये. म्हणून मग तो नेमक्या तेवढ्या पाच-दहा मिनिटांमध्ये लपाछपी खेळायला घेतो. तिकडं नवरीचा जामानिमा शेवटचा मुलामा देण्याच्या तयारीत असतो आणि इकडं 'मामा येईना कामा' अशी हाकाटी माजते. दोन-चार चुलतमावस मामे ऐनवेळी खिलाडूपणे मदतीचा हात पुढं करतात. शेवटी खरा मामा आणि बनवलेले मामा असे एकाच्या जागी तीन-चार मामालोक वधस्तंभाकडं चारुदत्ताला न्यावं तसं बोहल्याकडं मुलीला घेऊन जातात. वाटेत दोन-चार क्लोजअप्स आणि तीस सेकंदाचं व्हिडियो शूटिंग होतं, ते वेगळंच. नवरा मुलगा आधीच बोहल्यावर आलेला असतो. तो उगाच इकडंतिकडं बघून हसत वेळ काढतो. हे हसू काळजीपोटीचं असतं. नवरीला यायला जसजसा उशीर होतो तसतसा हा धसकत जातो, हिनं लग्नाबद्दल फेरविचार तर नाही ना सुरू केला ? तसं झालं तर 'वरात गेली आणि *(सक्तीचं)* ब्रह्मचर्य आलं,' अशी नवी म्हण तयार करावी लागायची ? सुदैवानं तसं होत नाही. वधुवेषामध्ये नटलेली नवरी एकदाची बोहल्यापर्यंत पोचते आणि सुरू होतात 'गंगा-सिंधु-सरस्वती-चर्मण्वती' इत्यादी इत्यादी.

जिथं लग्न लागतं, त्या स्टेजवर दोन व्यक्तींनी 'व्हिण्टेज पोझिशन्स' घेतलेल्या असतात. त्यापैकी एक करवली किंवा करवल्या. ही कन्यका तूर्त बोहल्याच्या मागं उभी असली तरी पहिल्या संधीला बोहल्यावर चढण्याचा मौका तिला पकडायचा असतो म्हणून लोकांना सतत दिसण्याची, चांगलं दिसण्याची, रडू आलंच तरी मेकअप् पुसला जाणार नाही इतपत रडण्याची, प्रत्येक फोटोच्या चौकटीमध्ये येण्याची सांस्कृतिक सक्ती जिच्यावर करवली जाते ती करवली. तिला स्टेजवर महत्त्वाचं स्थान हवंच. दुसरा महत्त्वाकांक्षी घटक असतो हौशी मंगलाष्टक-गायकांचा. अगदी कितीही पट्टीचे भटजी झाले, तरी आवाजाची पट्टी बदलताना

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

त्यांना श्वास घ्यावा लागणारच. तेवढ्या क्षणार्धाच्या फटीमध्ये घुसणं, भटजींच्या हातातला लाऊडस्पीकर हिसकावून घेणं, कोपरानं दुसऱ्या स्पर्धक गायकाला मागं ढकलणं आणि कुणा गं. भा. जान्हवीआजींनी नातीला-नातवाला दिलेल्या काव्यमय शुभेच्छा गाऊन दाखवणं, या कसबासाठी या मंडळींनाही अटेंन्शन पोझिशन घ्यावी लागते. मागे एका मंगलाष्टका गाणाऱ्यानं सरळ नवरदेवालाच बाजूला ढकलण्याचा प्रयत्न केला होता. त्यानं नवरी अस्वस्थ झाल्याचं; पण बाकी कुणालाही काहीही कळलं नसल्याचं स्पष्ट आठवतंय.

अंतरपाटामागं उभ्या असलेल्या नवरीनं कावरंबावरं व्हावं, माफक रडावं, वरमाला घेतलेल्या तिच्या हाताला कंप सुटावा अशी कल्पना ज्या जुन्या मनांमध्ये येते, त्यांनी आपला सगळा जुनाटपणा सोडावा हेच बरं. आता काही नवऱ्या मुली अंतरपाटामागं फिदीफिदी हसत असतात. हॉलच्या मुख्य दरवाजातून नव्यानं आत शिरणाऱ्या आपल्या उशिरा येणाऱ्या सहकाऱ्यांना हातानं खाणाखुणा करत असतात. सखी-मैत्रिणीकडून बिंदी नीट करून घेत असतात. अगदी अलिकडं तर असंही दृश्य दिसलं की नवरीमुलगी अंतरपाटाच्या कडेकडेनं नवऱ्या मुलालाच वेडावून दाखवत होती आणि तो अंतरपाटावरून हात उंच टाकून तिला टुक् टुक् करत होता. त्यांनी कदाचित 'लाजवा रे लाजवा' असा आदेश ऐकला असेल! भटजी आपले मूकबधीर निष्ठेनं म्हणत होते — यन्मंगलम् महेन्द्रस्य प्राप्ते देवसमागमम्.'

'वाजवा रे वाजवा' ही सूचना खरं तर वाजंत्रीवाल्यांसाठी असते; पण कार्यालयामधल्या अनेक लोकांना वाटतं की आवाज करण्याची खरी जबाबदारी आपल्यावर आहे. लग्न लागल्या लागल्या जी पहिली ऑफिसवाल्यांची पंगत बसवायची तिथं ताटं-वाट्या-भांड्यांच्या मांडीमांडीचे आवाज याच वेळेस सुरू होतात. धुऊन-पुसून आलेल्या वाट्या-भांड्यांचं टोपलं किंवा घमेलं त्यांनी जमिनीवर पालथं केलं की सगळं कार्यालय दणाणून जातं. पेढा-पानसुपारी-फुलांचे गोटे ( ! ) वगैरे देणारे स्वयंसेवक आपापल्या परीनं आवाज करत असतात. नव्या फिल्मी पद्धतीनं नवरा-नवरीला उंच उचलून घ्यायचा मनसुबा करणारे त्यांचे साथी-सोबती तशा हालचालींमध्ये गुंतलेले असतात. दरवाजात नव्यानं आलेले बॅण्डवाले आपापली, आपापल्या वाद्यांची घडी बसवताना भरपूर गलका करतात. लग्न लागल्यावर वरमाईची साखरेची ओटी भरण्याची सामग्री सांभाळून उभी असलेली बाई 'रेडी स्टेडी गो' अशा आविर्भावात असते. शिवाय पुढे हो, मागे राहा अशा असंख्य मौलिक सूचना तिला पुन्हा पुन्हा करणारी एक टोळी तिच्या आसपास असते. लग्न लागताना नीट दिसावं

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

म्हणून खुर्च्या खराखरा मागं पुढं करून त्यावर उभं राहायला धडपडणारी कार्टी पोरटी असतात. त्यांना रागावणारी मोठी माणसं असतात. तेवढ्यात कुणी तरी स्थानिक पुढारी किंवा मंत्री प्रवेशता झाला, म्हणजे तर कोलाहलाला सीमा राहत नाही. एका पवित्र मंगलविधीचा असा तमाशाचा फड करण्याचं आपलं कौशल्य डोळ्यात आणि कानात भरल्याशिवाय राहत नाही.

एवढं करून अक्षरश: मुहूर्ताला लग्न लागल्याचं कमीच दिसतं. आमचे एक स्नेही याला 'इंजिनिअरिंग टॉलरन्स' असं म्हणतात. नऊ तेवीसचा मुहूर्त म्हणजे सव्वानऊ ते साडेनऊ एवढा कालावधी चांगला आहे असं समजायचं! तेवढ्यात ते लागलं की मिळवली. शिवाय लग्न लावताना शंभरदा 'सावधान-सावधान' असा इशारा दिलेला असतोच. तेव्हा घटिका पळांची चूकभूल देणेघेणे! लग्नातली मंगलाष्टकं हा विलक्षण लवचिक काव्यप्रकार आहे. तो एका कडव्यापासून ऐंशी कडव्यांपर्यंत कितीही कमीजास्त म्हणता येतो. कधी भराव घालायची, वेळ भरवायची गरज पडलीच तर तोंडाशी रामरक्षा असतेच. रामो राजमणी सदा विजयते वगैरे झालं की भटजी एकमुखानं आदेश देतात 'वाजवा रे वाजवा.' अर्धा क्षण ओझरती शांतता पसरते आणि एकदम ताशे-चौघडे-वाजंत्री जीव खाऊन किंचाळायला लागतात. लागलं रे लागलं...

गोंगाटापूर्वीच्या शांततेच्या या अर्ध्या/पाव क्षणाला शब्दात पकडता येत नाही; पण तो आठवतो, दिसतो, हुरहूर लावतो. नि:शब्दाची ती क्षणिक ताकद शब्दांना फिकं पाडते, नाहीतरी शब्दांचे अर्थ घ्यावे तसे घेतले जातातच ना? 'वाजवा रे वाजवा' या आदेशाचा अर्थ लग्नानंतर आपण उभयंता सारखं 'वाजवत' राहिलं पाहिजे, असा घेणारी जोडपी थोडी का आहेत? लग्नाचं वाजण्याशी वाजवी नातं आहे हेच खरं.

लग्न ठरवत असताना, करत असताना त्यापासून माणसं काय काय अपेक्षा करतात ते सांगणारा एक संस्कृत श्लोक आहे. 'कन्या वरयते रूपं, माता वित्तम् पिता श्रुतम्' अशासारखी सुरुवात असणाऱ्या त्या श्लोकात असं म्हटलंय, की लग्न करणारी तरुण मुलगी सर्वाधिक महत्त्व देत असते ते वराच्या रूपसौंदर्याला. मुलीची आई नजर ठेवून असते ती मुलीच्या सासरच्या आर्थिक सुस्थितीवर. मुलीच्या बापाचा ओढा असतो तो जावयाच्या, त्याच्या घराच्या सामाजिक स्थानाकडं. असं करता करता उरते लग्नाला जमणारी गर्दी. गर्दीचं चित्त कशात? तर मिष्टान्नं इतरेजना: ...गर्दीला लग्नानंतर मिळणाऱ्या चारी ठाव जेवणात, जिलबी-मठ्ठा-मसालेभात वगैरेंमध्ये फक्त रस असतो. बाकी त्या लग्नाचं, नवरानवरीचं पुढं काही का होईना!

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

हा श्लोक कुणी, कोणत्या काळात लिहिला असेल हे अचूक कळणं शक्य नाही. त्याचे संदर्भ शोधायला काही शतकं मागं जावं लागणार हे नक्कीच; पण आजच्या काळाच्या संदर्भात पाहिलं तर खरोखर किती इतरेजनांना लग्नानंतरच्या मिष्टान्नामध्ये रस वाटत असेल, याबाबत मला शंका वाटते. एक तर सरासरी चंगळमय जीवनामुळं मिष्टान्नांचं नावीन्य फारसं उरलेलं नाही. खाण्यापिण्याच्या प्रथा आणि परी इतक्या वाढल्या आहेत की ऐसपैस बैठक मारून ताटभर जेवणारी माणसं उरलेलीच नाहीत आणि लग्नाचं जेवण तरी कुठं पूर्वीसारखं राहिलंय ? एक काळ असा होता, की निदान पुण्यात तरी अमुक कार्यालयाची बटाटाभाजी स्वर्गीय, फलाण्याकडलं पंचामृत अवर्णनीय अशी उदंड खाद्यख्याती होती. आता असलं एकसुरी, प्रतिगामी जेवण मिळणारही नाही आणि मंडळी गिळणारही नाहीत. आता कुठंही जिलबी-मठ्ठ्याच्या जोडीनं रशियन सॅलड, व्हेज कुर्मा, पनीर माखनवाला किंवा उंधियो, झालंच तर वाटीत सिंधी कढी, दाक्षिणात्य इदडा, मध्येच सुरती खमण, डावीकडं सरसोच्या तेलातलं लोणचं असा विलक्षण आंतरभारती किंवा विश्वभारती थाट असतो. खाणारे लोक हे सगळं प्रत्येकी एकाच पोटात ढकलतात, तेव्हा आपोआपच विविधतेतून एकता साधली जाते. चवीचा मेळ कितपत साधला जातो हे ज्याचा तो जाणे !

लग्नाची पंगत ही फार खेळकर बाब असते. कशी ते पाहा. टेबलखुर्च्या मांडलेल्या असतील तर जेवणासाठी आपापली खुर्ची पकडताना संगीतखुर्ची खेळली जाते. विशिष्ट जिन्नस वाढणारे वाढपी खोखो खेळतात. पांढरा भात वाढणारा ताक वाढणाऱ्याला खो देतो. मठ्ठा वाढणारा आणि जिलबी वाढणारा कायमच लपाछपी खेळतात. जे दोन पदार्थ जोडीनं खायचे, ते कधीच जोडीनं वाढले जात नाहीत. मठ्ठ्याच्या वाट्या रिकाम्या झाल्या की जिलबीचा डोंगर पुढ्यात आलाच पाहिजे. मसालेभात वाढणारा लांबचा रस्ता काढून आपल्यासमोर येतो, तेव्हा त्याच्या भांड्यात फक्त चार शितं उरलेली असतात. आपण भात मागितला की तो 'नाटेठोम' म्हणतो. कधी कधी दोन वाढप्यांमध्ये टाय होतो. कधी एक वाढपी दुसऱ्या वाढप्याची सर्व्हिस ब्रेक करतो. पाहुण्यांची कंटाळलेली लेकरंबाळं पंगतीनं धावाधावी खेळून खेळकरपणात अजूनच भर घालतात.

लग्नसमारंभ हा जेव्हा सर्वस्वी कौटुंबिक व्यवस्थापनानं होत असतो, तेव्हा लग्नाची तयारी करणं म्हणजे अगोदरचा निदान एखादा महिना स्वयंपाकघरात राबणं असे. लोणची-पापडपापड्या विशिष्ट - पिठं-फराळाच्या पदार्थांचा कच्चा माल-भाजण्या गव्हले-मालत्या हे सगळं क्रमाक्रमानं तयार केलं जाई. यातून वातावरणनिर्मिती होई. लोकांना चांगलं, सात्त्विक खायला मिळे. वधू-पित्याचा

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

खर्च कमी होई. लग्न होऊन गेल्यावरही महिना-दोन महिने घरामध्ये जिन्नस उरत, पुरत. आता येऊन जाऊन 'मेथीमटारमलई द्यायची का पालकपनीर द्यायचं' हे फक्त कॉन्ट्रॅक्टरला सांगावं लागतं. तो त्याच्या छापील मेन्यूवर पेनानं हव्या तेवढ्या टिका मारून घेतो आणि शेवटी करायचं तेच करतो. बहुतेक पंजाबी ग्रेव्हीवाल्या जिनसांची चव सारखीच असल्यानं वाटीभर रंगीत गरगटाच्या आतमध्ये हातातला दोन-चार चणे लागले की, छोले दिलेत असं म्हणायचं, बटाट्याच्या फोडी लागल्या की दम आलू म्हणायचं आणि इतर भाज्यांचे चौकोन त्रिकोण लागले की काही तरी जयपुरी कुर्मा वगैरे म्हणायचं! कशाच्याही वरती किमान एक सेंटीमीटर तेलाचा तवंग हा आलाच पाहिजे. उगाच दरिद्री कॉन्ट्रॅक्टरनं तेलातुपाची काटकसर केली, असं कुणी कुरकुरायला नको. तेलाची सढळ धार हटकून वाटीत, वाटीतून ताटात, एके काळच्या पांढऱ्या टेबलक्लॉथवर, नंतर कुणाच्या उंची कांजीवरम् साडीवर, रेशमी झब्ब्यावर, पुढं तोंड पुसण्याच्या नॅपकीनला अशी सर्वदूर पसरत जाते. वेशीबाहेर ओघळ गेला – अशा वर्णनाच्या या कृतीचा एक फायदा होतो. पुढं-मागं एक वेळ नवरा-नवरी स्वत:चं लग्न झालेलं विसरतील; पण तो झब्बा, तो शालू कधीही त्या लग्नाची आठवण विसरू शकत नाही. डागाच्या रूपात तो तो जिन्नस अजरामर राहतो.

लग्नाच्या जेवणासाठी पंगत बरी की बुफे या स्वरूपाच्या चर्चा मी गेली वीस-पंचवीस वर्षं ऐकते आहे. ते वाढणाऱ्यांपेक्षा जेवणाऱ्यांवर जास्त अवलंबून आहे, ही साधी गोष्ट लोक का उच्चारत नाहीत हेच मला कळत नाही. पंगतीतसुद्धा ताटामध्ये कोंबडं नाचल्यासारखं, अन्न चिवडून, विसकटून जाणारे भिडू असतात, तर बुफे हे पेशवाई ताटातलं जेवण मानून तास न् तास रवंथ करत उभे राहणारे लोकही असतात. हे ज्याच्या त्याच्या तब्येतीवरून, धीर धरण्यावरून ठरत असतं. या दोन्हीत फरक असला, तर फक्त हाणण्यासाठी बनवलेल्या पदार्थांच्या संख्येमध्ये असतो. पंगतीच्या जेवणाला मनुष्यप्राणी साधारण एका वेळी निदान चाखून बघू शकेल इतपत, म्हणजे ठोक पाच ते आठ पदार्थ मुख्यत: केले जातात. बुफेला संख्येचं सोयरसुतक नसतं. चेकाळल्यासारखे तीस-चाळीस पदार्थ करायचे. जेवायला येणारा प्रत्येक मनुष्य भुकेकंगाल आहे, मोठ्या दुष्काळातून आलेला आहे, बकासुराचा जवळचा, लांबचा नातेवाईक आहे, त्याला पोट नसून त्याजागी भिस्त्याची पखाल आहे असं मानून या जेवणाचा कट शिजवला जातो. समजा, यानंही कुणाचं पोट भरलं नाही तर असावेत म्हणून कुठं पाणीपुरीचे स्टॉल लाव, कुठं चायनीज फूडची गाडी टाक, कुठं बर्फाचा गोळेवाला उभा कर असे खेळही केलेले असतात. खा लेको किती खाता ते! खाऊनच दाखवा! यापुढं आयुष्यात

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

तुम्हाला जेवण मिळेल, न मिळेल, तेव्हा हे मिळतंय तेवढं खाऊन घ्या, असा एकूण भाव असतो. तसलं ते जेवण *( बघूनच )* अंगावर येतं. माणसासारखं थोडं चवीचवीनं जेवावंसं वाटतं.

रिसेप्शनसाठी उपमा, बटाटेवडा, पेढा-बर्फी, वेफर्स, सामोसा असं काही मांडलेली डिश देण्याची प्रथा आता पुरती नामशेष झाली आहे. तिथंही अन्नछत्र उघडलेलं असतं; पण काही थोड्याच प्रकारांना मागणी असते. पाणीपुरीच्या पुऱ्यांचा थाळा आला किंवा कापलेल्या आंब्यांच्या फोडींचा डोंगर आला की सगळी माणसं त्याच्यावर आक्रमण करतात. हर हर महादेवऽ असं म्हणत नाहीत एवढंच ! बाकी आवेश तोच असतो. तिकडं मेथीची भाजी, दाल फ्राय वगैरे ॲण्टिसेप्टिक जिन्नस वाळत पडलेले असतात. पाणीपुरीची मात्र ओढाओढी ! सहसा रिसेप्शनला शाळा-महाविद्यालयांमधल्या मित्रमैत्रिणी, ऑफिसमधले सहकारी हे निमंत्रित असतात. एकूण माहौल तरुण असतो, रात्र चढत जात असते, नवरा-नवरी हलंके हलके रंगात यायला लागलेले असतात. म्हातारेकोतारे नातेवाईक थकून-कंटाळून बाजूला झालेले असतात — म्हणजे वाटेतले काटे दूर झालेले असतात आणि रोषणाई, वाद्यमेळ, खरं-खोटं सौंदर्य, रेशमी सळसळ यांचा पगडा मनामनांवर बसू लागतो. त्याच्यात कुणी तरी रिसेप्शनला घास देण्याचं फॅड काढतं. सकाळी जिलेबीचे घास, फोटो, उखाणे हा सगळा सांस्कृतिक सोहळा झालेला असूनही एखाद्याचा आंबटशौक जागा होतो. मग, ‘ द्राक्षाच्या वेलीला त्रिकोणी पान, बंटीला नूडल्स भरवून राखते सर्वांचा मान ’ किंवा ‘ शंकराला वाहावा बेल, तुळस विष्णूला वाहावी, जिमीला भरवते त्याची लाडकी अमेरिकन चॉपसुई ’ असला संस्कृतीसंकर कानी पडायला वेळ लागत नाही. हळूहळू जवळ येण्याची वेळ जवळ येत असल्याचं हे चिन्हच नव्हे काय ? माणसांचंही आणि संस्कृतींचंही !

लग्नामध्ये पैजा लावून जेवण्याचं, ताटावारी जिलब्या रिचवण्याचं एक वय असतं. त्या वयात सकाळी साडेदहाच्या पहिल्या पंक्तीला रीतसर जेवून पुन्हा साडेतीनच्या शेवटच्या पंक्तीला मजबूत जेवावं. वाटेत एक मानाची पंगत नावाचं जंक्शन लागतं. त्यात जेवण कमी आणि मानापानाची खेकटी फार असतात. काका लोकांना कोणत्या क्रमानं जेवायला बसवलं, नेमकं नणंदेच्या नवऱ्याला चांदीचं ताट नव्हतं, आजींच्या ताटासमोर उदबत्त्यांची सोंगटी ठेवून त्यांना उदबत्त्यांच्या धुरानं गुदमरवलं, फलाण्याढकाण्याला नेमकी कचवट जिलबी वाढली असे मुद्दे काही लोकांच्या दातांमध्ये बरोब्बर अडकतात. ते पुढं जन्मभर त्यांना आठवतही राहतात. या दैवी स्मरणशक्तीबद्दल त्यांची कीव करावी की राग

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

करावा हेच समजत नाही. ' रात गयी, बात गयी ' तसं ' लग्न हुआ पंगत गयी ' एवढ्या क्षुल्लक गोष्टीचं एवढं स्तोम माजवणं हे मनाच्या रिकामपणाचंच लक्षण नाही का ? बाप होऽ पोटं एवढी भर भर भरता, मग मनं एवढी रिकामी का हो ?

बाकी हे ज्याचे त्याचे प्रश्न ज्यानं त्यानं सोडवावेत. नुसतं प्रेक्षक म्हणून लग्नाच्या पंगतीमध्ये, बुफेमध्ये हिंडणं मला मनापासून आवडतं. पदार्थांकडं न बघता माणसांकडं बघत बसलं, तरी खूप गोष्टी कळतात-जाणवतात-भिडतात. तो आनंद लुटावा, घरी येऊन घरचा — धड शिजलेला- ओढाओढी न करता मिळवलेला दहीभात व्यवस्थित खावा आणि मोघम शुभेच्छा व्यक्त करावी, अन्नदाताऽ सुखी भव !

आपल्या लग्नसमारंभांमधला सगळ्यात उडतपगडा, बिनबुडाचा कार्यक्रम म्हणजे ' रिसेप्शन. ' याला मराठीमध्ये ' स्वागत समारंभ ' असा शब्द ज्या कुणी सुचवला असेल तो धन्य होय. या समारंभाइतकं ' घाऊक स्वागत ' फक्त राजकारणी नेत्यांचंच होत असेल. एरवी रिसेप्शनला ना धार्मिक पाया, ना सांस्कृतिक अधिष्ठान, ना कौटुंबिक लागेबांधे. शेकडो, हजारो असंबद्ध माणसं तास-दोन तासांत आपण गोळा करू शकतो. एवढं सामाजिक शक्तिप्रदर्शन करण्यापलीकडं रिसेप्शननं काहीही साधत नाही. त्याला व्यक्तिगत जवळीक नसते, म्हणजे किती नसते ? तर आजकाल लग्नमंडपाच्या दाराशी एक उंच उभा फिरता पंखा भस्सकन् सुगंधी फवारा मारायला ठेवलेला असतो. घ्या लेको ! सुगंध हवा ना, घ्या. ते सेंट, अत्तर एखाद्याच्या कानात जाऊ द्या, एखाद्याची शर्टाची बाही भिजू द्या, किंवा एखादं पोर त्या झोतानं उडायला लागू द्या. एकेकाळी अत्तर लावण्याच्या मिषानं प्रत्येक पाहुण्याला मळहातावर, बोटात, मनगटात कुठंही अत्तरदाणीतल्या चांदीच्या काड्या खुपसत असत. ती पद्धत फार महान होती, असं काही म्हणवत नाही; पण ती काडी, तिचं टोक, तो हात, तो अत्तराचा बोळा हे सगळं सापडेपर्यंत जितीजागती माणसं क्षण-दोन क्षण एकमेकांसमोर उभी तरी राहत असत. आता सुगंधी पंख्याच्या एका झोतात पाच-पन्नास माणसं एकदम नाहून निघणार. जे कोरडे राहिले ते कोरडेच राहणार. अशा यंत्रांसमोरून जायला लागलं की माझं तोंड आश्चर्यानं आणि अपेक्षेनंही उघडं राहायला लागतं. न जाणो, असंच आणखी एखादं यंत्र लग्नाचे पेढे फेकत असेल, तर आपल्याला आपला पेढा अचूक मटकावता आला पाहिजे. खाणं आणि त्यातही फुकट खाणं या विषयावरची आपली पकड ढिली पडता कामा नये.

अर्थात रिसेप्शनमध्ये तो सुगंधी फवारा सोडता बाकी काही फुकट किंवा आयतं मिळत नसतंच. अगोदरच फाटकापासून स्टेजपर्यंतचं भलं मोठं अंतर गर्दी

कापत कापायचं असतं. दुरून कचकड्याच्या बाहुल्यांसारखी छोटीछोटी दिसणारी नवरा-नवरी जवळून बघण्याची ही किंमत असते. त्यात स्टेजवर चढण्याचं ते प्रस्तरारोहण ! एवढे लक्षावधी रुपये खर्च करून लग्न करतात, ते लोक स्टेजवर चढण्याच्या दोन भक्कम भरंवशाच्या पायऱ्या का बांधून घेऊ शकत नाहीत, हे मला न सुटलेलं कोडं आहे. पायऱ्यांबाबत डगमग, फसगत व्हायलाच हवी. पायऱ्या सर झाल्या की नवरात्रात चतु:श्रृंगीसमोर असतात तेवढ्या लांब रांगेत घुसाघुशी करायची. स्टेजवर सहा बाहुल्या असतात. नवरानवरी या मुख्य बाहुल्या. नवऱ्याचे आई-बाप आणि नवरीचे आई-बाप या 'जोड' बाहुल्या. निवडक लोकांचे या बाहुल्यांबरोबर फोटो काढायचे. बाकीच्यांना नुसतं ह्यॅ...ऽऽह्यॅऽऽ करून दूर सारायचं. नवरानवरींवर दोन्ही बाजूंनी ओळखींचा भडीमार सुरू असतो.

"पमे, हे आमचे डी. जी. एम. बरं का !"




मग पमीनं हसायचं *( 'हे आपले पंतप्रधान बरं का' किंवा 'हा आपल्या कोपऱ्यावरचा पानवाला बरं का' अशा कोणत्याही ओळखीला पमी एवढंच हसणार असते. )*

"बंड्या, या आपल्या नगरच्या काकूंच्या वहिनी. ओळखलंस का ?"

यावर बंड्यानं या कानापासून त्या कानापर्यंत मान हलवायची. आता नगरच्या काकूंच्या वहिनीच काय; पण खुद्द काकू किंवा आख्खं नगरही त्याच्या



Scanning and PDF creation by : Majhi Duniya

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

खिजगणतीत नसतं. काय ते सगळ्यांनी 'गिळा' आणि 'टळा' किंवा इंग्रजीतलं 'इटा आणि सुटा' अशा घाईला आलेल्या बंड्यानं काही शे-दोनशे माणसांची तोंडओळख करून द्यायची-घ्यायची असते. पुढं सवडीनं लग्नाचा फोटोचा अल्बम किंवा व्हिडियो कॅसेट बघून लग्नाला खरोखरच कोण कोण येऊन गेलं होतं, याची शहानिशा करून घ्यायची सोय असते. लग्नाला निम्मी गल्ली, निम्मं गाव, निम्मा जिल्हा, निम्मा देश हजेरी लावून गेला, की पाहुण्यांच्या संख्येच्या पटीमध्ये लग्नाचा दर्जा मोजला जातो. एखाद्या लग्नात पाहुण्यांच्या गर्दीत दहा लोक चेंगरून-चिरडून मेले किंवा जमावावर लाठीमार-गोळीबार करावा लागला, एवढ्या बातम्या फक्त अजून कुठं वाचनात आल्या नाहीत.

लग्नाची सवय असणाऱ्यांना *(म्हणजे लग्न करण्याची नव्हे, लग्नांना हजेरी लावण्याची)* कुठल्या कार्यालयात कोणता पदार्थ बरा मिळतो, कुठला हॉलवाला आइस्क्रीमच्या फारच पातळ चकत्या कापतो, कुठल्या लॉनवर विडे आधीच संपतात, अशा आतल्या गोटातल्या विश्वसनीय माहित्या असतात. त्यानुसार ते आपलं धोरण ठरवतात. अगोदरच गेल्या गेल्या दोन विडे उचलून पर्समध्ये टाकणं, आधी एकदा आइस्क्रीम खाऊन मग इकडंतिकडं करून जेवण घेणं, अमूल लोण्याचं नवं खोकं उघडलेलं दिसलं की तवा-भाजीकडं धावणं, अशा 'स्ट्रॅटेजीज्' या लोकांकडून शिकून घ्याव्यात. चुकून मुद्दाम सन्माननीय अतिथींच्या आसपास कसं राहावं, फोटोफोटोमध्ये आपलं मुंडकं कसं घालावं हेही शिकून घ्यावं. जखमा बुजल्या तरी व्रण उरतात, तसंच लग्नं संपली तरी फोटो उरत असतात. लग्नाच्या संबंधात फोटो, शालू-शेल्यांवरचे डाग, कुणाचा तरी कुणीतरी नीट मानपान न केल्याच्या कटू आठवणी असं बरंच काही उरत असलं तरी लग्नाच्या दिवशी शेवटी शेवटी उत्साह उरणं कठीण पडतं. ओढूनताणून कितीही चंद्रबळ आणलं तरी हे सगळं संपत आलंय, संपणार आहे, हे जाणवल्याशिवाय राहत नाही. वरपक्षाला भात-पिठलं खायला घालणं, मुलीची पाठवणी करणं, आहेर-पुष्पगुच्छ वगैरे बॅगांमध्ये भरणं ही कामं दिसत असतात आणि उरकतही नसतात.

लग्नाची सरती संध्याकाळ आणि चढती रात्र हे प्रहर वेगवेगळ्या लोकांना, वेगवेगळ्या अर्थानं हुरहूर लावणारे असतात. नाही म्हटलं तरी त्या दिवसाचा, त्याच्या अगोदरच्या कित्येक दिवसांचा शीण देहावर साचत आलेला असतो; पण कार्याच्या नादात ईर्षेपोटी त्या-त्या गोष्टी करून होतात. लग्नाचा दिवस संपत येतो तेव्हा त्या सगळ्या कामाचं प्रयोजन संपत येतं. 'हातीच्या या

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

एवढ्यासाठी हे एवढंऽऽ, राबराब कसे राबलो आपण ?' हा विचार कार्य करणाऱ्यांना हुरहूर लावतो. एका दिवसात घालवलेल्या एवढ्या दिडक्या पुन्हा मिळवायला, गोळा करायला किती बरं कष्ट पडतील, हा विचार नवरीच्या जन्मदात्याला हुरहूर लावतो तर आपल्या लाडाकोडाच्या पोरीचं 'दिल्या घरी' बरं चालेल ना, हा विचार आईला अस्वस्थ करतो. नवरी वरकरणी खूप हसतखिदळत असली तरी माहेर सोडून जाण्याची कल्पना तिला आत आत सूक्ष्मपणे डाचत असते. नवरदेवांना भावी 'पुरुषार्थ' नीट जमेल की नाही याची हुरहूर असते. नवरीच्या मैत्रिणींना नवरीच्या जाण्यानं आपला ग्रुप मोडण्याची हुरहूर असते. एखाद्या 'खास' मित्राला नवरीला हातचं गमावल्याची हुरहूरही असू शकते. जमलेल्या काक्या, मावश्या, आत्या कंपनीपैकी ज्यांच्या ज्यांच्या घरांतून मुली सासरी गेलेल्या असतील त्यांना त्यांना संबंधित दिवस आठवून हुरहूर लागते, तर ज्यांच्या दाराला कठोर प्रयत्नांनंतरही अजून तोरण लागलेलं नसतं त्यांना कधी एकदा ते लागतंय, याची हुरहूर असते. छोट्या लेकराबाळांचा दिवसभर यथेच्छ लळालोंबा झालेला असल्यानं त्यांना घरी जाण्याची हुरहूर लागलेली असते. जी फार लहान असतात, ती सरळ गळे काढून 'घोरी चऽऽल ना' वगैरे घोशा लावून आपली अस्वस्थता व्यक्त करतात. अंमळ मोठी झालेली कार्टी 'या ताईच्या लग्नाला पुन्हा नाही ना आपण येणार ?' असले भेदक प्रश्न विचारून मन मोकळं करतात. आजी; पणजी वयोगटातल्या मंडळींना एकेक हातचं सुटत चालल्याची भावना हुरहूर लावते. एकूणच कुणाचंच तिथं मन रमत नसतं. वरती झगमगाट, दिवे, रोषणाई, बॅण्डबाजे हे सगळं असलं तरी आत आत हलकी काळोखी जमायला लागते. ज्याला त्याला पटकन् घरी जावंसंही वाटतं आणि घरी गेल्यावर फार काही करण्यासारखंही नसतं *(अर्थात नवरा-नवरी सोडून)* परत निघताना पहले आप, पहले आप, याला अच्छा कर, त्याला टाटा कर, असं करत करत माणसं उगाचच घुटमळतात. पुढं कार्यालयवाल्यानं वेळ संपल्याची उद्धट घंटा वाजवली किंवा माणसांच्या बुडाखालच्या खुर्च्या ओढायला सुरुवात केली म्हणजे मात्र नाईलाज होतो. एका कार्यासाठी जमलेली शे-पाचशे घरांमधली शे-पाचशे माणसं पांगायला लागतात, त्यातली बरीच पुनश्च दुसऱ्या एखाद्या कार्यातच भेटणार असतात.

रंगलेली मैफल उठल्यानंतर जे विसकटलेपण येतं, त्याचं सुंदर वर्णन कविराज ग. दि. माडगुळकर यांनी 'जोगिया' या कवितेच्या शेवटी केलेलं आहे. 'तबकात राहिले देठ-लवंगा-साली' असली असते रंगलेल्या

Scanning and PDF creation by : Majhi Duniya

जोगियाची फलश्रुती.' लग्नसमारंभाच्या भाडोत्री सभागृहांमध्ये एवढंही उरत नाही. नवरा-नवरीला घेऊन जाणारी सजवलेली मोटारगाडी फाटकाच्या बाहेर पडायच्या आत त्यांचं फटाफटा आवाज करत खुर्च्यांच्या घड्या घालणं सुरू होतं. सतरंज्या जागीच झटकून हॉलमध्ये उरलेल्यांना लवकरात लवकर खोकलादमा जडवण्याची खात्री ते करून घेतात. मागच्या अंगणात वाट्या-भांड्याचे डोंगर आणून त्यांची घासपूस सुरू होते. मॅनेजरवजा इसम 'धोंगडे -




झाडबुके शुभविवाह' असं लिहिलेला दर्शनी फलक पुसतो आणि 'भिवपाठकी-सोनाळकर शुभविवाह' ही नावं रजिस्टरमध्ये पाहून लिहायला घेतो. आतल्या दिशेला बघून हाळी देतो, "उद्या दोनशे नाश्ते तयार ठेवा बरं का आणि चाळीस उपास!"

शेवटी त्याची काय आणि तुमची आमची तरी काय, धाव असते ती लग्नाकडून लग्नाकडं!